# MT EDUCARE LTD.

**QUEST- I (Semi Prelim - II)**
**2018 - 19**

पाठ - ७ ते १२, **पद्य** - ४ ते ७ **स्थूलवाचन** - ३, ४
**व्याकरण, उपयोजित लेखन**

---

**CBSE - X** **Set - A**

**Roll No.** | | | | | | | | **Code No. 52/1**

**Series LRH/1**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| • | खण्डः क | : | १. अपठित गद्य उतारा<br>२. अपठित गद्य उतारा | 12 गुण |
| • | खण्डः ख | : | रचनात्मक लेखन<br>१. निबंध लेखन किंवा कथालेखन<br>२. पत्र लेखन | 12 गुण |
| • | खण्डः ग | : | व्याकरण | 16 गुण |
| • | खण्डः घ | : | साहित्य : गद्य, पद्य, स्थूलवाचन | 40 गुण |

***Time allowed*** **:** 3 hours ***Maximum Marks*** **:** 80

## MARATHI

**General Instructions :**

(१) चार खंड आहेत - क, ख, ग आणि घ.

(२) सूचनेप्रमाणे सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

(३) सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवावेत.

## खंड 'क'

**Q.1. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

'पुस्तकासारखा मित्र नाही,' असे म्हणतात. इतर मित्र आहेत, पण ते कधी रागावतात, कधी चिडवतात, तर कधी चेष्टा करतात. कधी वेळेच्या अभावी उपयोगी पडत नाहीत कधी ते आपले अंतरंग खुले करीत नाहीत. ते आपणांपासून काहीतरी लपवून ठेवतात. परंतु पुस्तकाचे तसे नाही. त्याला जवळ करण्याचा अवकाश की, ते आपले अंतरंग खुले करते. ते कधी फसवत नाही, कधी चुकवत नाही, नेहमी अगदी आपल्या सेवेस तयार असते.

पुस्तकांचे पुष्कळ प्रकार असतात. काही पुस्तके अल्पायुषी, तर काही दीर्घायुषी असतात. त्यांचे आयुष्य त्यांच्यामधील विचारांवर अवलंबून असते. विचार जितके स्थायी तितकी पुस्तके स्थायी. वर्तमानपत्राचे आयुष्य एक दिवस. सकाळी उत्साहाने व आतुरतेने ते आपण वाचतो, पण त्याचे पारायण करतो असे कोणी म्हणेल तर ते योग्य होणार नाही. मासिकांचे आयुष्य एक महिना. परंतु काही पुस्तके सदासर्वकाळ बहुमोल असून मनाला समाधान देतात. भगवद्गीता, बायबल, कुराण, वेद वगैरे ह्या प्रतीचे ग्रंथ होत.

**प्रश्न:**

१. सदासर्वकाळ बहुमोल असलेल्या कोणत्या ग्रंथांचा उल्लेख केला आहे ? **1**

२. पुस्तकांचे आयुष्य कशावर अवलंबून असते ? **1**

३. इतर मित्र व पुस्तक यांत फरक काय ? **2**

४. आपण पुस्तकाला जवळ केल्यास काय घडते ? **2**

**Q.2. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

गंमत म्हणजे आयुष्यात इतक्या परीक्षा दिल्या त्या खास काही आठवत नाहीत, आठवतात ते परीक्षांचे आदले दिवस. लांबच लांब पसरत गेलेले, न संपणारे, कंटाळवाणे आदले दिवस. प्रत्यक्ष परीक्षा पटकन संपतात. हातात कोरी उत्तरपत्रिका येते आणि भल्याबुऱ्याप्रमाणे दोनअडीच तासांत भरवून परत केली जाते. परीक्षेचा अगोदरचा दिवस कोराच येतो आणि कोराच जातो जातो. कुठला नेटानेटाने ढकलावा लागतो. नव्याने करण्याजोगे काही काम नसते. त्या दिवसाआधी जो काही अभ्यास करायचा असतो तो वर्षभरात करून झालेला असतो. जो वर्षभरात झेपला नाही तो त्या शेवटच्या दिवशी उरकण्याची काही आशा नसते. शिवाय एकदम सगळाच अभ्यास चोख झाला तर न जाणो पहिले बिहिले येऊ हे टेन्शन, पहिले येऊन आपलेच इतक्या वर्षाचे रेकॉर्ड आपण मोडणे योग्य नसते. काय करावे काय करू नये याचा विचार करीत करीतच तो दिवस ढकलावा लागतो. फक्त विचार, कृती नाही.

**प्रश्न:**

१. परीक्षेचा अगोदरचा दिवस कसा ढकलला जातो ? **2**

२. परीक्षेचा अगोदरचा दिवस कसा असतो ? **2**

३. प्रत्यक्ष परीक्षेचा दिवस कसा जातो ? 1

४. समानार्थी शब्द लिहा ? 1

अ) गंमत ब) दिवस

खंड 'ख'

**Q.3. खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा. (कोणतेही एक)** **7**

१. **माझे आजोबा**

**मुद्दे** : आजोबांचे कुटुंबातील स्थान - त्यांचा स्वभाव, गुण - वैशिष्ट्य - त्यांचे एकूण व्यक्तिमत्व दैनंदिन कार्यक्रम - संस्कार - कुटुंबावर त्यांच्या विचारांचा परिणाम - सर्वांविषयी प्रेम - त्यांच्याविषयी आदराची भावना - शेवट.

२. **पाऊस पडला नाही तर ....**

**मुद्दे** : पावसाचे महत्त्व - जीवन जगण्यासाठी आवश्यक - पाण्याची आवश्यकता - नदी, नाले, कोरडे - मानव, पशू, पक्षी - भयानक वातावरण - कल्पनाच भयंकर - शेवट

३. **फाटक्या पुस्तकाचे आत्मवृत्त**

**मुद्दे** : निर्मिती- त्यावेळी भोगाव्या लागणाऱ्या यातना - निर्मितीचा आनंद - त्यानंतरचा प्रवास - आजची स्थिती - अपेक्षा - शेवट.

**किंवा**

**मुद्दे** : श्रीमंत म्हातारा – दोन नोकर – कोंबडा आरवला की म्हातारा उठे – नोकरांना उठवून काम करायला सांगे – नोकरांनी विचार करून कोंबड्याला मारणे – म्हाताऱ्याचे वेळी-अवेळी उठणे – नोकरांना उठवणे – नोकरांना पहिल्यापेक्षा जास्त काम – पश्चात्ताप – तात्पर्य.

**Q.4. खालील विषयावर पत्र लिहा.** **5**

१. संदीप/ साधना बोरकर, मु. पो. खडवली, जि. ठाणे येथून पत्र लिहून अनियमित वीजपुरवठ्याबाबत विभागीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, ठाणे यांच्याकडे तक्रार करतो / करते. (लिफाफा आवश्यक)

**किंवा**

२. संगिता/ सुजित काळे, विद्यार्थी प्रतिनिधी, ज्ञानदीप विद्यालय, भांडूप (पूर्व) येथून शाळेसमोरील रस्ता नादुरुस्त असल्या कारणाने विभागीय अधिकारी, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना पत्र लिहिते/ लिहितो. (लिफाफा आवश्यक)

### खंड 'ग'

**Q.5. अ) खालील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही चार)** **4**

१. अबब ! केवढी उंच ही इमारत ! (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)
२. दिल्ली व कानपूर ही ठिकाणांची नावे आहेत. (क्रियापद ओळखा)
३. त्याने पांढरा शर्ट घातला आहे. (विशेषण ओळखा)
४. टेबलावर चष्मा आहे. (शब्दयोगी अव्यय ओळखा)
५. मी तिकडे गेलो; पण तो आलाच नाही. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)
६. सचिन पटापट चालतो. (क्रियाविशेषण अव्यय ओळखा)

**Q.5. आ) कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा. (कोणतेही दोन)** **2**

१. आम्ही शाळा बंद पाडतो. (प्रयोग ओळखा)
२. बागेत फेरफटका मारावा. (आज्ञार्थी करा)
३. शिपायाने चोराला धरले. (प्रयोग ओळखा)
४. प्रत्येकजण स्वयंभू आहे. (प्रश्नार्थी करा)

**Q.5. इ) सूचनेनुसार बदल करा. (कोणतेही दोन)** **2**

१. तो मला मदत करेल. (काळ ओळखा)
२. मुले अभ्यास करतील. (वर्तमानकाळ करा)
३. सैनिकाने शत्रूला मारले. (काळ ओळखा)
४. अक्षय घरी आला आहे. (भूतकाळ करा)

**Q.5. ई) लिंग बदला. (कोणतेही दोन)** **2**

१. पुजारी - ........... २. बालक - ...........
३. तरूण - ........... ४. मालक - ...........

**Q.5. उ) वचन बदला. (कोणतेही दोन)** **2**

१. रस्ता - ........... २. पोळी - ...........
३. दुकान - ........... ४. केळे - ...........

**Q.5. ऊ) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१. पृथ्वी - ........... २. आभाळ - ...........
३. मित्र - ........... ४. पक्षी - ...........

**Q.5. ए) विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१. आशा × ........... २. थंड × ...........
३. आवड × ........... ४. विश्वास × ...........

खंड 'घ'

**Q.6. अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही चार)** **4**

१. बाहेर आपण ...... मिळवायला फिरावं. (जेवण, अन्न, भोजन, मिष्टान्न)

२. वेदनेचे .......... कसे रूपांतर होईल हा ध्यास या पतीपत्नीला लागला. (आनंदात, सुखात, प्रेमात)

३. खूप विचारांची .......... झाली. (दाटी, गर्दी, गडबड, कोंडी)

४. बाबूजींसाठी कुणाकडेही .......... नव्हता. (पैसा, वेळ, टाइम, आपलेपणा)

५. माझी सगळी ........... पाठ झालीयेत. (सूत्रं, गणितं, उत्तरं, समीकरणं)

६. त्या घरात माझा जीव .......... होता. (रमत, गुदमरत, लागत, कंटाळत)

**Q.6. आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही सहा)** **6**

१. मंदार काय पाठ झाली, असे म्हणतो?

२. सरिता व्यवसायाने कोण होती?

३. नवा दिवस कसा उगवतो आणि कसा मावळतो?

४. साधनाताई आमटे यांचे लग्नाअगोदरचे नाव काय होते?

५. लेखिकेच्या घरी उरूसाचा स्वयंपाक रात्रभर कोण करत असे?

६. पाऊस सुरू झाला की काय वाहून जाते?

७. लेखिकेच्या घरात मुस्लीम म्हणून किती ईद साजऱ्या केल्या जात?

८. मुंग्यांची मुलं कोणावर रागावली?

**Q.7. अ) आकृतिबंध पूर्ण करा (कोणतेही तीन)** **6**

१.



२.




३.




४.




५.




**Q.7. आ) खालील प्रश्नांची ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** **6**

१. नागिणीचे शहाणपण कोणत्या प्रसंगातून दिसून येते?

२. 'ईद' या सणाच्या दिवशी लेखिका आशा आपराद यांच्या घरी वातावरण कसे असे?

३. केशवच्या घरी गेल्यावर लेखकाच्या मनात कोणते विचार आले?

४. पुस्तकरावाला कशाकशाचा त्रास होतो?

**Q.8.** **अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. (कोणतेही चार)** **4**

१. मातीलाही सुगंध यावा....... भाकरीचा.
(नाचणीच्या, ज्वारीच्या, कष्टाच्या, जमीनदोस्त)

२. .......... पीक नाचते काळ्याभोर शिवारी.
(पिवळेजर्द, हिरवेगार, निळेशार, काळेभोर)

३. आपण .......... ज्योती. (जिजाऊच्या, सावित्रीच्या, रमाईच्या, यशोदेच्या)

४. चंद्र, सूर्य अन् इथली माती यांना अमुचे लाख ..........
(नमस्कार, मुजरे, प्रणाम, वंदन)

५. खुरटी .......... आकाशाला भिडावीत. (झाडे, झुडपे, वृक्ष, तरु)

६. सावरीत जखम खोल, .......... आला जरी बोल.
(विश्वाचा, समाजाचा, जगाचा, लोकांचा)

**Q.8.** **आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **3**

१. कवयित्रीस जीवन कसे वाटते?

२. स्त्रिया कोणाच्या नाती आहेत?

३. वाऱ्यावरती काय विरून जात आहेत?

४. विषमतेचे दगडगोटे कशाने वितळावेत,

५. कवितेतील आमराई कुठे आहे?

**Q.9.** **अ) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा. (कोणतेही एक)** **3**

१. मातीलाही सुगंध यावा कष्टाच्या भाकरीचा

२. सोसून सोसून किती गं सोसावं,
गिळून दुःख सारं, साऱ्या जगा पोसावं

३. इंद्रधनूचे रंग वेगळे, तरिही त्यांची एक कमान
विभिन्नतेतहि देश गातसे एकत्वाचे गीत महान ।।

**Q.9.** **आ) आकृतिबंध पूर्ण करा (कोणतेही दोन)** **4**

१.



२.




३.




**Q.10. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **4**

१. जुईचे आईबाबा घरी कोणकोणती कामे करतात?

२. 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते.' हे विधान पाठाच्या आधारे सोदाहरण स्पष्ट करा.

३. स्वतः झाड झाल्यावर चिनार व जुई यांना कोणता अनुभव आला?

***Best of Luck***